☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट /226/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025/ दिनांक : 07/06/2025

# 1)जबरी चोरी :-

**हिमायतनगर :-** दिनांक 06.06.2025 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **गायरान जमीन मौ. विरसणी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. शेख अफरोज, 2. सोनु देवसरकर, 3. अनोळखी आठ ते दहा इसम सर्व रा. विरसणी ता. हिमायतनगर जि. नांदेड यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देवुन गालावर चापटा मारून लाकडाने दोन्ही पायाचे मागील बाजुस मुक्का मार मारला व इतर आठ ते दहा आरोपीतांनी लाथा बुक्याने मारहाण करून फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन पाच ग्रॅम किंमत 40,000/-रू ची जबरीने हिसकावुन घेतली व फिर्यादीचे दोन्ही मोबाईल फोडुन 60,000/-रू चे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी गजानन पि. विजय जिदेवार, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती व पत्रकार रा. आष्टी ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 120/2025 कलम 119(1),118(1), 115(2),351(2),189(2),191(2)(3),190,324(4) बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि /श्री मद्दे, मो.नं. 9763255035** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :-

**1.हदगांव :-** दिनांक 06.06.2025 रोजी 10.30 ते 12.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी ग्रीन पार्क कॉलनी हदगांव ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे बंद घराचे अज्ञात आरोपीतांनी कुलूप कोंडा तोडुन घरात घुसून कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने किंमत 2,69,000/-रू व नगदी 5500/-रू असा एकुण 2,74,000/-रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अंजली उत्तमराव माने, वय 35 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. ग्रीन पार्क कॉलनी हदगांव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे हदगांव गुरनं 183/2025** कलम 331(3),305 बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रायबोळे, मो. नं. 7020433473** हे करीत आहेत.

**2.शिवाजीनगर :-** दिनांक 05.06.2025 रोजी 17.00 ते दि. 06.06.2025 चे 08.00 वा. चे दरम्यान, तेहरानगर **नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे बंद घराचे अज्ञात चोरटयांनी कुलूप कोंडा तोडुन घरात प्रवेश करून घरातील संसार उपयोगी साहीत्य पीतळी घागर, स्टीलची टाकी, तीन जर्मन पातेले, होम थेटर, मीक्सर, पाण्याची मोटार किंमत 10,000/-रू व बॅगमधील नगदी 50,000/-रू असा एकुण 60,000/-रू चे साहित्य व नगदी कॅश चोरून नेली. वगैरे **फिर्यादी आश्वीनी मीलींद जाधव, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. तेहरानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे शिवाजीनगर गुरनं 216/2025** कलम 331(3)(4),305(अ), बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2014 शीरसाठ, मो. नं. 7020510553** हे करीत आहेत. **सदरचा गुन्हा उघडकीस आला असुन गुन्हयातील मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

**3.मुखेड :-** दिनांक 05.06.2025 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी मौजे देवला तांडा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.बालाजी रामकिशन भोसले, वय 45 वर्षे 2. एक विधीसंघर्ष बालक, दोघे रा. देवला तांडा ता. मुखेड यांनी संगणमत करून फिर्यादीचे घराचे दाराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून सोन्या चांदीचे दागीने असा एकुण 70,000/-रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शिवाजी गोविंद राठोड, वय 37 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. देवला तांडा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे मुखेड गुरनं 126/2025** कलम 331(4),305(अ), बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो. नं. 8390695468** हे करीत आहेत. **सदरचा गुन्हा उघडकीस आला असुन गुन्हयातील मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**

# 3)आत्महत्येस प्रवृत्त केले :-

**माळाकोळी :-**दिनांक 20.05.2025 रोजी सायंकाळी 19.00 वा. चे पुर्वी वेळ नक्की नाही, **मयताचे राहाते घरी मौ. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील मयत नामे ऋषिकेश आनंदराव गुट्टे वय 35 वर्षे, रा. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड हा त्याची पत्नी आरोपी नामे 1. स्वाती ऋषिकेश गुट्टे 2. शिवाजी दादाराव कागणे सासरा 3. कालींदा शिवाजी कागणे, सासु 4. शितल तिडके, मेहुणी, सर्व रा. माळाकोळी ता. लोहा मयताची पत्नी हि वारंवार संशय घेते असल्याने व इतर आरोपी हे बदनामी केल्याचे व शेती नावावर करण्याचे कारणावरून सतत भांडण करून त्रास दिल्याने आरोपीतांच्या त्रासाला कंटाळुन राहते घरी दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. त्यांचे आत्महत्येस यातील आरोपीतांनी प्रवृत्त केले. फिर्यादीची मनस्थिती ठीक नसल्याने व दुःखात असल्याने उशिराने तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला. वगैरे **फिर्यादी राजश्री आनंदराव गुट्टे, व्यवसाय नौकरी रा. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 101/2025 कलम 108, 3(5) भारतीय न्याय संहिता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हक्के, मो. नं. 9112390633** हे करीत आहेत.

# 4)प्रोव्हिबिशन :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 06.06.2025 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **मुदखेड ते वाजेगाव बायपास रोडवरील जिओ टॉवरच्या बाजुस सार्वजनिक रोडवर लालवाडी फत्तेपुर ता. जि. नांदेड येथे** यातील आरोपी नामे बालाजी गजेंद्र पांचाळ, वय 35 वर्षे व्यवसाय मजुरी रा. लालवाडी फत्तेपुर ता. जि. नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 1680/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/रामकिशन पांडुरंग मोरे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 543/2025 कलम 65(ई) म. प्रो. का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास ग्रपोउपनि/श्री कदम, मो.नं. 9284351496** हे करीत आहेत.

# 5)गळफास घेवून आत्महत्या :–

**उस्माननगर :–**दिनांक 31.05.2025 रोजी 19.00 चे पुर्वी, **मयताचे राहाते घरी मौ. कलंबर बु. ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे हनुमानसिंह बाबुसिंग राजपुत, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. कलंबर बु. ता. लोहा जि. नांदेड**, यांनी सततची नापीकी व एसबीआय बँकेचे कर्ज कसे फेडावे या तणावातुन स्वताचे राहाते घरी पंख्याचे हुकास दोरीच्या साहयाने गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार निकीता हनुमान सिंह राजपुत, वय 23 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कलंबर बु. ता. लोहा जि. नांदेड**, यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उस्माननगर** आ. मृ. **31**/2025 कलम 194 भारतीय न्याय संहीता–2023 प्रमाणे दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गाडेकर, मो.नं. 9823148435** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड